पुढारी

# कबड्डीकडे करिअर म्हणून पाहा

## शांताराम जाधव : आंतरविद्यापीठ कबड्डी स्पर्धेचे शानदार उद्घाटन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

कबड्डी हा खेळ प्रामाणिकपणे खेळला पाहिजे. पैशांच्या अपेक्षेपेक्षा करिअर म्हणून खेळलात तर पाठोपाठ पैसासुद्धा आपोआपच येईल. या खेळाने करिअर घडते, हे लक्षात ठेवा. त्यामुळेच न थकता मेहनत करा, स्टॅमिना, ताकद आणि लवचिकता मिळवा. जिद्द आणि चिकाटीसोबत आत्मविश्वासाने कबड्डीत देशाचे नाव उज्ज्वल करा, असा कानमंत्र आंतरराष्ट्रीय कबड्डीपटू शांताराम जाधव यांनी सोमवारी विविध राज्यांच्या विद्यापीठांतून आलेल्या कबड्डीपटूंना दिला. जाधव यांच्या उत्स्फूर्त भाषणाला खेळाडूंना खणखणीत टाळ्या वाजवून दाद दिली.




**कोल्हापूर : आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धेचे आकाशात फुगे सोडून उद्घाटन करताना कबड्डीपटू शांताराम जाधव, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. विलास नांदवडेकर आदी. (छाया : पप्पू अत्तार)**

भारतीय विद्यापीठ महासंघ (एआययू) आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आजपासून आयोजित पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ कबड्डी स्पर्धांना सुरुवात झाली. स्पर्धेचे उद्घाटन जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमास कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे अध्यक्षस्थानी होते. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के प्रमुख उपस्थित होते. विद्यापीठाच्या खुल्या सभागृहात झालेल्या या कार्यक्रमास परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, व्यवस्थापन परिषद सदस्य संजय जाधव उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, खेळाडूने शारीरिक श्रम तर करायलाच हवेत. आपला खेळ निकोप करून खेळाचा दर्जा उंचावण्यासाठी प्रत्येक खेळाडूने प्रयत्न करायला हवेत. यावेळी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे आणि शांताराम जाधव यांच्या हस्ते एआययू आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या ध्वजांना वंदन करण्यात आले. तसेच, आकाशात फुगे सोडून स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आल्याचे जाहीर करण्यात आले.

कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी स्वागत केले. क्रीडा संचालक पी. टी. गायकवाड यांनी आभार मानले. यावेळी राष्ट्रीय पंच रमेश भेंडेगिरी यांच्यासह जिल्हा कबड्डी असोसिएशनचे पदाधिकारी, विविध महाविद्यालयांचे क्रीडा संचालक आणि खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठाची विजयी सलामी

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

यजमान शिवाजी विद्यापीठ संघाने दापोलीच्या डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ संघाला नमवत सामना ५६-२५ असा जिंकून विजयी सलामी दिली. कबड्डी स्पर्धेच्या उद्घाटनानंतर पाहुण्यांच्या समोर हा सामना झाला. शिवाजी विद्यापीठाच्या संघास विद्यार्थ्यांनी जोरदार प्रतिसाद दिला. सामना जिंकल्यानंतर कॅम्पसमध्ये विद्यार्थ्यांनी जोरदार जल्लोष केला. पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ पुरुष गट कबड्डी स्पर्धेस सोमवारपासून सुरुवात झाली.

शिवाजी विद्यापीठात सोमवारपासून सुरू झालेल्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ कबड्डी स्पर्धेच्या पहिल्या दिवशी झालेल्या सामन्यांचा निकाल पुढीलप्रमाणे -

गोवा विद्यापीठ (पणजी) विजयी विरुद्ध नवसारी विद्यापीठ (गुजरात), वीर नर्मदा दक्षिण गुजरात विद्यापीठ (सुरत) वि. वि. टिळक महाराष्ट्र विद्यापीठ (पुणे), उदयपूर विद्यापीठ (उदयपूर) वि.वि. गुजरात विद्यापीठ (गुजरात, विजयी घोषित), महाराजा गंगासिंग विद्यापीठ (बिकानेर) वि.वि. जोधपूर विद्यापीठ (राजस्थान), सरदार पटेल विद्यापीठ (भावनगर) वि.वि. जे.टी.एम. विद्यापीठ (ग्वाल्हेर), हेमचंद्र विद्यापीठ (गुजरात) वि.वि. डी.वाय. पाटील विद्यापीठ (मुंबई), स्वर्णीम-गुजरात क्रीडा विद्यापीठ (गांधीनगर) वि.वि. भक्त कवी नरसी मेहता विद्यापीठ (गुजरात), राजस्थान विद्यापीठ (जयपूर) वि.वि. एम.डी.एस. विद्यापीठ (अजमेर), कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ (जळगाव) वि.वि. एम.के.बी. विद्यापीठ (भावनगर, विजयी घोषित). संत गाडगेबाबा विद्यापीठ (अमरावती) वि.वि. रक्षा शक्ती विद्यापीठ (गुजरात), के.एस. विद्यापीठ (गांधीनगर) वि.वि. दत्ता मेघे इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस (वर्धा), राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ (नागपूर) वि.वि. जे.आर.एन. राजस्थान विद्यापीठ (राजस्थान).

सकाळ

## पश्चिम विभाग आंतरविद्यापीठ कबड्डी



**कोल्हापूर : पश्चिम विभाग आंतरविद्यापीठ कबड्डी स्पर्धेत सोमवारी शिवाजी विद्यापीठ विरुद्ध डॉ. बाळासाहेब सावंत कृषी विद्यापीठ, दापोली यांच्या सामन्यातील क्षण.**

# शिवाजी विद्यापीठाची विजयी सलामी

**कोल्हापूर, ता. २६ :** पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ कबड्डी (पुरुष) स्पर्धेमध्ये आज सलामीच्या सामन्यात शिवाजी विद्यापीठाने डॉ. बाळासाहेब सावंत कृषी विद्यापीठाच्या संघाचा पराभव करून विजयी सलामी दिली. आंतराष्ट्रीय कबड्डीपटू शांताराम जाधव आणि कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते ध्वजवंदनाने स्पर्धेला प्रारंभ झाला. गुजरात, राजस्थान, मध्यप्रदेश, महाराष्ट्र, गोवा राज्यातील ४५ संघ सहभागी आहेत.

विद्यापीठाच्या ओपन थिएटरमध्ये दुपारी चारला उद्घाटन सोहळा झाला. या वेळी विद्यापीठाच्या कबड्डी संघाचा कर्णधार अक्षय निकम याने प्रतिज्ञेचे वाचन केले. श्री. जाधव, डॉ. शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले. या वेळी प्रकुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. डी. आर. मोरे, क्रीडा अधिविभाग प्रमुख पी. टी. गायकवाड, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे उपस्थित होते.

शिवाजी विद्यापीठ विरुद्ध डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ यांच्यात सामना झाला. शिवाजी विद्यापीठाने आक्रमक खेळ करून सामन्यावर पकड मजबूत केली. शिवाजी विद्यापीठाने हा सामना ५६-२५ असा जिंकला.

**अन्य निकाल असे :** गोवा विद्यापीठ वि.वि. नवसारी विद्यापीठ, गुजरात (४३-१८), ीर नर्मद दक्षिण गुजरात विद्यापीठ, सूरत वि.वि. टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे (६२-१४), उदयपूर विद्यापीठ, उदयपूर वि. वि. गुजरात विद्यापीठ, गुजरात (विजयी घोषित) सरदार पटेल विद्यापीठ, भावनगर वि. वि. जे.टी.एम. विद्यापीठ, ग्वाल्हेर (६३-३१).

लोकमत






शिवाजी विद्यापीठात सोमवारी पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ पुरुष कबड्डी स्पर्धेचे उद्घाटन आंतरराष्ट्रीय कबड्डीपटू शांताराम जाधव आणि कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते आकाशात फुगे सोडून करण्यात आले. यावेळी डावीकडून संजय जाधव, विलास नांदवडेकर, डी. आर. मोरे, डी. टी. शिर्के, महेश काकडे, पी. टी. गायकवाड, व्ही. टी. पाटील उपस्थित होते. तर दुसऱ्या छायाचित्रात शिवाजी विद्यापीठाच्या संघाने दापोलीच्या डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाच्या संघावर मात करून विजयी सलामी दिली.

# ‘शिवाजी’सह अकरा संघांची विजयी सलामी

## ६८ संघ सहभागी: पश्चिम विभागीय कबड्डी स्पर्धेला प्रारंभ; करिअर घडविण्यासाठी खेळा : शांताराम जाधव

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ पुरुष कबड्डी स्पर्धेला शिवाजी विद्यापीठात सोमवारी उत्साहात प्रारंभ झाला. पहिल्या दिवशी यजमान शिवाजी विद्यापीठासह राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ (नागपूर), दत्त-मेघा इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्स (वर्धा), संत गाडगेबाबा विद्यापीठासह (अमरावती) अकरा विद्यापीठांच्या संघांनी विजयी सलामी देत पुढील फेरीत प्रवेश केला. असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीजतर्फे (एआययू) आयोजित या स्पर्धेत महाराष्ट्र, गुजरात, मध्यप्रदेश, राजस्थानमधील ६८ संघ सहभागी झाले आहेत.

विद्यापीठातील ओपन थिएटर येथे सायंकाळी पाच वाजता आंतरराष्ट्रीय कबड्डीपटू शांताराम जाधव यांच्या हस्ते या स्पर्धेचे उद्घाटन झाले. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, तर प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के प्रमुख उपस्थित होते. यावेळी आंतरराष्ट्रीय कबड्डीपटू जाधव म्हणाले, पैशांसाठी नव्हे, तर करिअर घडविण्यासाठी कबड्डी खेळा. करिअर घडल्यास आपोआप पैसे मिळतील. सध्या कबड्डीमध्ये आर्थिकदृष्ट्या करिअर बनविण्याची संधी आहे. या खेळात शरीर हेच एकमेव साधन आहे. ते तगडे बनवा. कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, खेळांमुळे शरीर तंदुरुस्त राहते. खेळांमागील विचार समजून घेणे आवश्यक आहे. या कार्यक्रमास परीक्षा व मूल्यमापन संचालक महेश काकडे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, डॉ. डी. आर. मोरे, संजय जाधव, संभाजी पाटील, रमेश भेंडिगिरी, बाबासाहेब उलपे, आदी उपस्थित होते. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी प्रास्ताविक केले. क्रीडा संचालक पी. टी. गायकवाड यांनी आभार मानले. दरम्यान, यजमान शिवाजी विद्यापीठ आणि दापोलीचे डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाच्या संघात उद्घाटनाचा सामना झाला. त्यात शिवाजी विद्यापीठाने सुरुवातीपासून आक्रमक खेळ करत कृषी विद्यापीठाला ५६-३१ अशा गुणांनी मात करून विजयी सलामी दिली. त्यामध्ये अक्षय निकम, सौरभ पाटील, राहुल वडार यांनी उत्कृष्ट कामगिरी केली. शिवाजी विद्यापीठाच्या खेळाला प्रेक्षकांनी टाळ्यांच्या गजरात दाद दिली. सायंकाळी सहानंतर लोककला केंद्रात विद्युतझोतामध्ये १५ सामने रंगले.

### सकाळच्या सत्रात चुरस रंगली

- सकाळच्या सत्रातील सामने चुरशीने रंगले. बिकानेरच्या महाराजा गगनसिंग युनिर्व्हसिटीने जोधपूर युनिर्व्हसिटीवर ४० गुणांनी, गोवा विद्यापीठाने गुजरातच्या नवसारी युनिर्व्हसिटीला २५ गुणांनी, सूरतच्या वीर नर्मदा साऊथ गुजरात युनिर्व्हसिटीने पुण्याच्या टिळक मराठा विद्यापीठाला ४८ गुणांनी हरविले. सरदार पटेल युनिर्व्हसिटीने आयटीएम ग्वाल्हेरला ३२ गुणांनी, हेमचंद्रा आचार्य गुजरातने मुंबईच्या डी. वाय. पाटील विद्यापीठाला १७ गुणांनी, सुवर्णम गुजरात स्पोर्ट्स युनिर्व्हसिटीने भक्तकवी नृसिंह मेहता युनिर्व्हसिटीला १२ गुणांनी नमविले.
- जयपूर युनिर्व्हसिटीने अजमेरच्या महर्षी दयानंद सरस्वती युनिर्व्हसिटीवर ९ गुणांनी निसटता विजय मिळविला. वर्धा येथील दत्त-मेघे इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सने गांधीनगरच्या (गुजरात) कडीसरवा विश्वविद्यालयाला ५२ गुणांनी हरविले. अमरावतीच्या संत गाडगेबाबा विद्यापीठाने गुजरातच्या रक्षाशक्ती युनिर्व्हसिटीला ३२ गुणांनी पराभूत केले. नागपूरच्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाने जनार्दन रायनगर राजस्थान युनिर्व्हसिटीवर ३८ गुणांनी विजय मिळविला.

### भावनगरचा संघ ठरला अपात्र

- भावनगरच्या महाराजा कृष्णकुमारसिंगजी युनिर्व्हसिटीचे पाच खेळाडू अपात्र ठरल्याने हा संघ स्पर्धेतून बाद झाला. त्यामुळे जळगावच्या उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाला पुढे चाल मिळाली.
- गुजरातचे चार्टर युनिर्व्हसिटी ऑफ सायन्स अनुपस्थित राहिल्याने उदयपूरच्या पॅसिफिक अकॅडमी ऑफ हायर एज्युकेशनला पुढे चाल मिळाली.

# शिवाजी विद्यापीठ संघाची विजयी सलामी

कोल्हापूर : येथे आजपासून सुरू झालेल्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ कबड्डी स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ संघाने दापोलीच्या डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठीवर ५६-२५ अशी मात करीत विजयी सलामी दिली. ज्येष्ठ कबड्डीपटू शांताराम जाधव यांच्या उपस्थितीत या स्पर्धेला प्रारंभ झाला. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे अध्यक्षस्थानी होते.

पहिल्या दिवशीच्या सामन्यांचे निकाल : गोवा विद्यापीठ वि.वि. नवसारी विद्यापीठ, वीर नर्मदा दक्षिण गुजरात विद्यापीठ वि. वि. टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, उदयपूर विद्यापीठ वि. वि. गुजरात विद्यापीठ, महाराजा गंगासिंग विद्यापीठ वि. वि. जोधपूर विद्यापीठ, सरदार पटेल विद्यापीठ वि. वि. जे. टी. एम. विद्यापीठ, हेमचंद्र विद्यापीठ वि. वि. डी. वाय. पाटील विद्यापीठ, स्वर्णीम-गुजरात क्रीडा विद्यापीठ, वि. वि. भक्त कवी नरसी मेहता विद्यापीठ, राजस्थान विद्यापीठ वि. वि. एम. डी. एस. विद्यापीठ, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ वि. वि. एम. के. बी. विद्यापीठ, संत गाडगेबाबा विद्यापीठ, अमरावती वि. वि. रक्षा शक्ती विद्यापीठ, गुजरात, के. एस. विद्यापीठ, गांधीनगर वि. वि. दत्ता मेघे इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस, वर्धा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर वि. वि. जे.आर.एन. राजस्थान विद्यापीठ.

27 NOV 2018

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापू

# शिवाजी विद्यापीठाची विजयी 'सलामी'

## पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ कबड्डी स्पर्धेला शानदार प्रारंभ: कोकण कृषी विद्यापीठ संघावर मात

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ येथे पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ कबड्डी स्पर्धेला सोमवारी शानदार प्रारंभ झाला. स्पर्धेचे उद्घाटन आंतरराष्ट्रीय कबड्डीपटू शांताराम जाधव यांच्या हस्ते व कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले. यावेळी डॉ. डी.टी. शिर्के, डॉ. विलास नांदवडेकर, महेश काकडे, डॉ.डी.आर.मोरे, डॉ.पी.टी. गायकवाड, संजय जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. यजमान शिवाजी विद्यापीठाने दणक्यात प्रारंभ करताना डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ दापोली संघावर ५६ विरुध्द २५ गुणांनी एकतर्फी मात करून विजयी सलामी दिली.




**कोल्हापूर : पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ कबड्डी स्पर्धेचे रंगीत फुगे सोडून उद्घाटन करताना आंतरराष्ट्रीय कबड्डीपटू शांताराम जाधव. यावेळी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. विलास नांदवडेकर, महेश काकडे, व्ही. टी. पाटील आदी मान्यवर.**

यावेळी आंतरराष्ट्रीय कबड्डीपटू जाधव म्हणाले, जोरदार मेहनत करा; स्टॅमिना, ताकद आणि लवचिकता मिळवा. देशाचे नाव कबड्डीत उज्ज्वल करा, असा कानमंत्र त्यांनी येथे विविध राज्यांच्या विद्यापीठांतून आलेल्या कबड्डीपटूंना दिला. कोणत्याही उपकरणाशिवाय खेळता येणारा खेळ म्हणजे कबड्डी. यातील आपली कामगिरी उंचावण्यासाठी खेळाडूंनी दररोज किमान सहा तास व्यायाम करायला हवा. प्रामाणिकपणे खेळले पाहिजे. पैशांच्या अपेक्षेपेक्षा करिअर म्हणून खेळलात, तर पाठोपाठ पैसाही आपोआपच येईल, असा सल्लाही त्यांनी यावेळी दिला. यावेळी स्पर्धेचे नेटके आयोजन केल्याबद्दल त्यांनी विद्यापीठाचे अभिनंदन केले.

शिवाजी विद्यापीठाचा कर्णधार अक्षय निकम याने उपस्थित खेळाडूंना शिस्त व खिलाडूपणाची शपथ म्हणून घेतली. यावेळी राष्ट्रीय पंच रमेश भेंडेगिरी, बाळासाहेब उलपे, अजित पाटील, उमा भोसले-भेंडिगिरी यांच्यासह जिल्हा कबड्डी असोसिएशनचे पदाधिकारी, विविध महाविद्यालयांचे क्रीडा संचालक आणि खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**सोमवारी झालेल्या शिवाजी विद्यापीठ विरूध्द डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ दापोली यांच्या सामन्यातील एक क्षण. (छाया - रियाज ट्रेनर).**

### पहिल्या दिवशी १२ संघांची आगेकूच

पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ कबड्डी स्पर्धेतील पहिल्या दिवशी सकाळच्या सत्रात झालेल्या १२ सामन्यातील विजयी संघ असे, १) गोवा विद्यापीठ, पणजी वि.वि. नवसारी विद्यापीठ, गुजरात (४३-१८), २) वीर नर्मद दक्षिण गुजरात विद्यापीठ, सूरत वि.वि. टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे (६२-१४), ३) उदयपूर विद्यापीठ, उदयपूर वि.वि. गुजरात विद्यापीठ, गुजरात (विजयी घोषित), ४) महाराजा गंगासिंग विद्यापीठ, बिकानेर वि.वि. जोधपूर विद्यापीठ, राजस्थान (५७-१७), ५) सरदार पटेल विद्यापीठ, भावनगर वि.वि. जे. टी.एम. विद्यापीठ, ग्वाल्हेर (६३-३१), ६) हेमचंद्र विद्यापीठ, गुजरात वि.वि. डी.वाय. पाटील विद्यापीठ, मुंबई (५४-३७), ७) स्वर्णिम-गुजरात क्रीडा विद्यापीठ, गांधीनगर वि.वि. भक्त कवी नरसी मेहता विद्यापीठ, गुजरात (३८-२६), ८) राजस्थान विद्यापीठ, जयपूर वि.वि. एम.डी.एस. विद्यापीठ, अजमेर (४१-३२), ९) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव वि.वि. एम.के. बी. विद्यापीठ, भावनगर (विजयी घोषित), १०) संत गाडगेबाबा विद्यापीठ, अमरावती वि.वि. रक्षा शक्ती विद्यापीठ, गुजरात (५८-२५), ११) के.एस. विद्यापीठ, गांधीनगर वि.वि. दत्ता मेघे इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस, वर्धा (७०-१८), १२) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर वि.वि. जे.आर.एन. राजस्थान विद्यापीठ, राजस्थान (५७-१८). तसेच दुपारी चार वाजता उद्घाटनाचा सामना यजमान शिवाजी विद्यापीठ आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली या दोन संघांमध्ये सामना खेळविण्यात आला. या सामन्यात शिवाजी विद्यापीठाने दापोली विद्यापीठावर ५६ विरुध्द २५ गुणांनी एकतर्फी मात केली. या सामन्यानंतर रात्री उशिरापर्यंत प्रकाशझोतामध्येही सामने खेळविण्यात आले.

# नागपूर, वर्धा, अमरावतीसह दहा संघ पुढील फेरीत

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**
शिवाजी विद्यापीठात सोमवारी असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीजतर्फे (एआययू) आयोजित पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ पुरुष कबड्डी स्पर्धेस पहिल्याच दिवशी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ (नागपूर), दत्त-मेघा इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्स (वर्धा), संत गागडेबाबा विद्यापीठासह (अमरावती) दहा विद्यापीठांच्या संघांनी पुढील फेरीत प्रवेश केला.

पहिल्या सामन्यात बिकानेरच्या महाराजा गगनसिंग युनिव्हर्सिटीने जोधपूर युनिव्हर्सिटीवर ४० गुणांनी, गोवा विद्यापीठाने गुजरातच्या नवसारी युनिव्हर्सिटीला २५ गुणांनी, सुरतच्या वीर नर्मदा साऊथ गुजरात युनिव्हर्सिटीने पुण्याच्या टिळक मराठा विद्यापीठाला ४८ गुणांनी हरवले.

सरदार पटेल युनिव्हर्सिटीने आयटीएम ग्वाल्हेरला ३२ गुणांनी, हेमचंद्राआचार्य गुजरातने मुंबईच्या डी. वाय. पाटील विद्यापीठाला १७ गुणांनी, सुवर्णम गुजरात स्पोर्टस् युनिव्हर्सिटीने भक्तकवी नृसिंह मेहता युनिव्हर्सिटीला १२ गुणांनी नमवले.जयपूर युनिव्हर्सिटीने अजमेरच्या महर्षी दयानंद सरस्वती युनिव्हर्सिटीवर ९ गुणांनी निसटता विजय मिळविला.

## शिवाजी विद्यापीठात पश्चिम विभागीय कबड्डीला प्रारंभ



**कोल्हापूर : पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धेच्या उद्‌घाटन समारंभप्रसंगी शिवाजी विद्यापीठ विरुद्ध कृषी विद्यापीठ, दापोली यांच्यात झालेल्या सामन्यातील एक क्षण.**
**(छाया : एस. अली)**

वर्धा येथील दत्त-मेघा इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सने गांधीनगरच्या (गुजरात) कडीसरवा विश्वविद्यालयाला ५२ गुणांनी हरवले. अमरावतीच्या संत गागडेबाबा विद्यापीठाने गुजरातच्या रक्षाशक्ती युनिव्हर्सिटीला ३२ गुणांनी पराभूत केले. नागपूरच्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाने जर्नादन रायनगर राजस्थान युनिव्हर्सिटीवर ३८ गुणांनी विजय मिळवला.

उद्‌घाटनावेळी यजमान शिवाजी विद्यापीठ आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली या दोन संघांमध्ये सामना खेळवण्यात आला. हा सामना शिवाजी विद्यापीठाने ५६-२५ असा जिंकला. या स्पर्धेत महाराष्ट्र, गुजरात, मध्य प्रदेश, राजस्थानमधील ६८ संघ सहभागी झाले आहेत.

### मेहनतीशिवाय पर्याय नाही

जोरदार मेहनत करा; स्टॅमिना, ताकद आणि लवचिकता मिळवा. देशाचे नाव कबड्डीत उज्ज्वल करा, असा कानमंत्र आंतरराष्ट्रीय कबड्डीपटू शांताराम जाधव यांनी कबड्डीपटूंना दिला.

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे अध्यक्षस्थानी होते, तर प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के प्रमुख उपस्थित होते. विद्यापीठाच्या खुल्या सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात व्यासपीठावर परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, क्रीडा संचालक डॉ. पी. टी. गायकवाड, व्यवस्थापन परिषद सदस्य संजय जाधव उपस्थित होते.

पुढारी



**जरा याद करो उनकी कुर्बानी...**

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र आणि मास कम्युनिकेशन विभागाच्या वतीने सोमवारी २६/११ च्या हल्ल्यातील शहिदांना अभिवादन करण्यासाठी कँडल मार्च काढण्यात आला. (छाया : पप्पू अत्तार)

# विद्यापीठात शहिदांना अभिवादन

## कँडल मार्च; विद्यार्थ्यांनी घेतली शपथ

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

मुंबईवर झालेल्या २६/११ च्या हल्ल्यातील शहिदांना शिवाजी विद्यापीठात अभिवादन करण्यात आले. वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र आणि मास कम्युनिकेशन विभागाच्या वतीने सोमवारी कँडल मार्च काढण्यात आला. संविधानाचा जागर करत यावेळी बलशाली भारत घडवण्याची विद्यार्थ्यांनी शपथ घेतली.

विद्यापीठातील मुलींच्या वसतिगृहापासून कँडल मार्चला प्रारंभ झाला. हा मार्च मुख्य इमारतीसमोर आला. मुंबईवरील दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या पोलिस अधिकारी, सैन्यातील जवान यांच्या छायाचित्रांसमोर मेणबत्त्या प्रज्वलित करून या हल्ल्यात शहीद झालेल्यांना अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी संविधानाविषयी निष्ठा राखण्याची तसेच व्यसनमुक्त, भ्रष्टाचारमुक्त भारत घडवण्यासाठी योगदान देण्याची विद्यार्थ्यांनी शपथ घेतली. विद्यार्थ्यांसह प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, नागरिकांनीही या कँडल मार्चमध्ये सहभागी होत आदरांजली वाहिली.

या कार्यक्रमाला शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, शिवाजी विद्यापीठाचे शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, वित्त व लेखा अधिकारी विलास पाटील, वित्त अधिकारी अजित चौगुले, वृत्तपत्रविद्या विभागाच्या प्रमुख डॉ. निशा मुडे-पवार, डॉ. श्रीहरी देशपांडे, सहाय्यक प्राध्यापक डॉ. शिवाजी जाधव, वनस्पतीशास्त्र विभागाचे डॉ. डी. के. गायकवाड, डॉ. सुमेधा साळुंखे-घाटगे, सुधाकर बरगे, दिव्या कांबळे आदींसह विद्यार्थी उपस्थित होते.

लोकमत

# विद्यापीठात शहिदांना आदरांजली

## 'कँडल मार्च' : दहशतवाद रोखण्याची विद्यार्थ्यांनी घेतली शपथ

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : मुंबईतील २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यात शहिद झालेल्या विरांना येथील शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी 'कँडल मार्च' काढून सोमवारी आदरांजली वाहिली. विद्यापीठातील मुख्य इमारतीसमोर सायंकाळी शहिदांच्या प्रतिमेसमोर मेणबत्ती प्रज्वलित करून अभिवादन करण्यात आले.

विद्यापीठातील मास कम्युनिकेशन विभागातर्फे हा 'कँडल मार्च' आयोजित करण्यात आला होता. सोमवारी सायंकाळी साडेसहा वाजता मुलींच्या वसतिगृहापासून या कँडल मार्चला प्रारंभ झाला. येथून शेकडो विद्यार्थी विद्यापीठाच्या मुख्य इमारतीसमोर आले. त्याठिकाणी शहिदांच्या प्रतिमेसमोर विद्यार्थ्यांनी मेणबत्त्या प्रज्वलित करून आदरांजली वाहिली. यावेळी विद्यार्थ्यांनी दहशतवाद रोखणे आणि भारतीय संविधानाबद्दल निष्ठा बाळगण्याची शपथ घेतली.



**शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य इमारतीसमोर सोमवारी विद्यार्थिनींनी मेणबत्त्या प्रज्वलित करून मुंबईतील २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यातील शहिदांना आदरांजली वाहिली.**

यावेळी आंतरराष्ट्रीय कबड्डीपटू शांताराम जाधव, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, मास कम्युनिकेशनच्या समन्वयक डॉ. निशा पवार, डॉ. शिवाजी जाधव, डॉ. सुमेधा साळुंखे, डॉ. श्रीहरी देशपांडे, सुधाकर बरगे, आदींसह विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# शहिदांना आदरांजली

कोल्हापूर : मुंबईवरील २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या पोलीस अधिकारी, कर्मचारी व जवानांना कँडल मार्च काढून शिवाजी विद्यापीठातील मास कम्युनिकेशन अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी आदरांजली वाहिली. यावेळी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, विभागप्रमुख डॉ. निशा मुडे-पवार यांच्यासह प्राध्यापक, विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होत्या. (छाया : एस. अली)

लोकमत

# सांविधानिक नैतिकता प्रस्थापित करा : भालेराव

## हरिष भालेराव : विद्यापीठातील व्याख्यान

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** देशात उच्चप्रतीची सांविधानिक नैतिकता प्रस्थापित करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. लोकशाही पद्धती हीच भारतीयांची जीवनशैली असली पाहिजे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत व प्राचार्य डॉ. हरिष भालेराव यांनी सोमवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रातर्फे संविधान दिनानिमित्त आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. 'भारतीय संविधानातील मूलभूत हक्क व मार्गदर्शक तत्त्वे' असा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. मानव्यशास्त्र अधिविभागातील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, तर कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर प्रमुख उपस्थित होते.

डॉ. भालेराव म्हणाले, नागरिकांना मुक्त वातावरणात जीवन जगता आले पाहिजे. यासाठी मूलभूत हक्कांची गरज असते. प्रत्येक भारतीयाचे राहणीमान उंचावून त्याला प्रतिष्ठा प्राप्त करून देणे आणि त्यांच्या मनात उच्चनीचतेची, परस्परांबद्दल श्रेष्ठ-कनिष्ठत्याची भावना निर्माण न होऊ देणे या गोष्टी संविधानाला अभिप्रेत आहेत.

डॉ. शिर्के म्हणाले, संविधान हे केवळ पुस्तक नसून बाबासाहेबांनी या देशाला दिलेला मानवी मूल्यांचा दस्तावेज आहे. यासंदर्भात जागरूकता अत्यंत महत्त्वाची आहे. या कार्यक्रमात संविधान दूतांचा गौरव करण्यात आला.



### भालेराव म्हणाले

- राज्याने कसे वागावे, हे मार्गदर्शक तत्त्वे सांगतात. ती राज्याची धोरणांबाबतची नैतिकता आहे.
- विकास, चौकसबुद्धी, मानवतावाद, वैज्ञानिक दृष्टीकोनाला चालना देणारी आपली मार्गदर्शक तत्त्वे आहेत.
- धोरणे आखताना या तत्त्वांकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही.

प्रारंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस डॉ. शिर्के यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन करण्यात आले.

यावेळी अधिष्ठाता डॉ. ए. एम. गुरव, प्रमोद वासंबेकर,के. डी. सोनवणे, आर. जी. सोनकवडे, प्रा. शोभा शेटे, पी. एस. पांडव, आनंद खामकर, सचिन देठे उपस्थित होते. डॉ. आंबेडकर केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी प्रास्ताविक केले.

वैभव कांबळे यांनी सूत्रसंचालन केले. अर्थशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. पी.एस. कांबळे यांनी आभार मानले.

Hello Kolhapur
Page No. 2 Nov 27, 2018
Powered by: erelego.com

# संविधानिक नैतिकतेची जबाबदारी प्रत्येकावर

## प्राचार्य डॉ. हरिश भालेराव




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात संविधान दिनानिमित्त आयोजित विशेष व्याख्यानात बोलताना प्राचार्य डॉ. हरिश भालेराव. व्यासपीठावर प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. श्रीकृष्ण महाजन.**

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

देशात उच्च प्रतीची संविधानिक नैतिकता प्रस्थापित करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत प्राचार्य डॉ. हरिश भालेराव यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रातर्फे संविधान दिनानिमित्त 'भारतीय संविधानातील मूलभूत हक्क व मार्गदर्शक तत्त्वे' या विषयावर डॉ. भालेराव यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते, त्यावेळी ते बोलत होते. मानव्यशास्त्र अधिविभागात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर प्रमुख उपस्थित होते.

डॉ. भालेराव म्हणाले, नागरिकांना मुक्त वातावरणात जीवन जगता आले पाहिजे यासाठी मूलभूत हक्कांची गरज असते. भेदाभेदाने व्याप्त, विषमतायुक्त समाजात स्वातंत्र्य, समता, बंधुता, सहिष्णुता या मूल्यांची प्रस्थापना करण्याचे ध्येय संविधान बाळगून आहे. प्रत्येक भारतीयाचे राहणीमान उंचावून त्याला प्रतिष्ठा प्राप्त करून देणे आणि त्यांच्या मनात उच्च-नीच, परस्परांबद्दल श्रेष्ठ-कनिष्ठत्वाची भावना निर्माण न होऊ देणे या गोष्टी संविधानाला अभिप्रेत आहेत.

भारतीय संविधानात समानतेचा हक्क, स्वातंत्र्याचा हक्क, शोषणाविरुद्धचा हक्क, धर्मस्वातंत्र्याचा हक्क, सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क आणि संविधानिक उपाय योजण्याचा हक्क या मूलभूत हक्कांचा समावेश आहे. राज्याने कसे वागावे, हे मार्गदर्शक तत्त्वे सांगतात आणि ती राज्याची धोरणाबाबतची नैतिकता आहे. विकास, चौकस बुद्धी, मानवतावाद आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाला चालना देणारी आपली मार्गदर्शक तत्त्वे असून त्यामध्ये पर्यावरण आणि पशू यांच्यासंदर्भातही सजगतेचा आग्रह दिसून येतो. धोरणे आखताना मार्गदर्शक तत्त्वांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. धोरणांच्या सकारात्मक अंमलबजावणीसाठी राजकीय नैतिकता कळीची भूमिका बजावत असते.

अध्यक्षीय भाषणात प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, संविधान हे केवळ पुस्तक नसून बाबासाहेबांनी या देशाला दिलेला मानवी मूल्यांचा दस्तावेज आहे. यासंदर्भात जागरुकता अत्यंत महत्त्वाची आहे. यातल्या शब्दाशब्दाचा अभ्यास व प्रसार करणे ही आपल्यातल्या प्रत्येकाची वैयक्तिक आणि सामूहिक जबाबदारी असल्याचेही त्यांनी नमूद केले.

यावेळी प्रातिनिधिक स्वरूपात अधिविभाग तसेच महाविद्यालयीन स्तरावर नियुक्त करण्यात आलेल्या संविधानदूतांचा गौरव करण्यात आला. सुरुवातीला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस डॉ. शिर्के यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले तसेच संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन करण्यात आले.

डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी स्वागत व प्रास्ताविक केले, तर अर्थशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. पी. एस. कांबळे यांनी आभार मानले. वैभव कांबळे यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी अधिष्ठाता डॉ. ए. एम. गुरव, डॉ. प्रमोद वासंबेकर, डॉ. के. डी. सोनवणे, डॉ. आर. जी. सोनकवडे, प्रा. शोभा शेटे, डॉ. पी. एस. पांडव, आनंद खामकर, सचिन देठे आदींसह विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.



नामदेव चरापले यांना सन्मानित करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे.

# नामदेव चरापले यांचा सन्मान

**धामोड / प्रतिनिधी :**

शिरगाव (ता. राधानगरी) येथील नामदेव नाना चरापले (सध्या कोल्हापूर) यांना गुणवंत अधिकारी वर्ग दोन पुरस्कार देऊन सन्मानित केले. विद्यापीठाच्या कार्यक्रमात त्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते.

विद्यापीठातील भाषा विभागामध्ये लँग्वेज लॅब टेक्निशियन नामदेव चरापले यांना संगणक केंद्रामध्ये वरिष्ठ तांत्रिक सहायक म्हणून बढतीने नियुक्ती झाली असून तब्बल चोवीस वर्षांच्या सेवेत त्यांनी प्रशासनासह संगणक केंद्रामध्ये उत्कृष्ट काम केल्याबद्दल त्यांना पत्नी अंजली यांच्यासह कवयित्री बहिणाबाई चौधरी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी. पी. पाटील, प्र. कुलगुरू डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

डॉ. जहांगीरदार, डॉ. पी. पी. पाटील, डॉ. जयप्रकाश शिंदे, स्वाती खराडे यांचे मार्गदर्शन लाभले. बाबूराव चरापले, शोभा चरापले, धनाजीराव चरापले, मंगल चरापले, शिवाजी चरापले, नेताजी चरापले, देवबा चरापले, शामराव चरापले, विठ्ठल चरापले, बंडोपंत चरापले, प्रशांत चरापले उपस्थित होते.

लोकमत

# विद्यार्थीप्रिय शिक्षक हरपला

## एन. व्ही. चिटणीस यांना आदरांजली

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. नरसिंह वामनराव तथा एन. व्ही. चिटणीस यांच्या निधनामुळे अत्यंत उमदा, विद्यार्थीप्रिय शिक्षक काळाच्या पडद्याआड गेला आहे, अशी भावना विद्यापीठात सोमवारी शोकसभेत व्यक्त करण्यात आली.

डॉ. चिटणीस यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी विद्यापीठात सोमवारी शोकसभा घेण्यात आली. कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, डॉ. चिटणीसांचे व्यक्तिमत्त्व प्रसन्न होते. ते उपक्रमशील शिक्षक होते. त्यांनी अनेक नवीन उपक्रम राबविले. त्यांच्या निधनाने विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाची अपरिमित हानी झाली आहे. प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, डॉ. चिटणीस यांच्या निधनामुळे मी एका चांगल्या मित्राला मुकलो आहे.

यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी शोकप्रस्तावाचे वाचन केले. अधिष्ठाता डॉ. भारती पाटील, निखील भगत, गायन समाज देवल क्लबचे अरुण डोंगरे, समर्थ कशाळीकर यांच्यासह विविध संघटनांच्या प्रतिनिधींनी शोकभावना व्यक्त केल्या. यावेळी विद्यापीठातील शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, सेवक, विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

Hello Kolhapur
Page No. 8 Nov 27, 2018
Powered by: erelego.com